


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : ३१ वा शनिवार दि. ०१ मार्च २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# ठाकरे गट विधानसभा विरोधीपक्ष नेतेपदावर हक्क सांगणार, आदित्य ठाकरेंना संधी?

**वृत्तसंस्था/ नाशिक**

विधानसभेच्या विरोधीपक्ष नेतेपदावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष हक्क सांगणार आहे, अशी माहिती खासदार संजय राऊत यांनी दिली. शिवसेनेचं बळ २० आमदारांचं आहे. याआधी याहून कमी संख्या असतानाही विरोधीपक्ष नेतेपद मिळालेलं आहे, याकडे राऊतांनी लक्ष वेधलं. विधानसभा अध्यक्षांना संविधानाविषयी चाड असावी, असंही राऊत म्हणाले. मी कालच्या बैठकीत नव्हतो, मी नाशिक दौऱ्यावर आहे. त्यामुळे आदित्य ठाकरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याच्या चर्चे विषयी माहिती नाही, असं संजय राऊत म्हणाले. आठ दिवसांनी लोकसभेचं अधिवेशन आहे. त्यासंदर्भात आमदार-खासदारांना दिशा मिळावी, यासाठी संसदीय पक्षाच्या बैठका पक्षप्रमुख घेत असतात. विधानसभेच्या विरोधीपक्ष नेतेपदावर शिवसेना (ठाकरे गट) दावा म्हणणार नाही, पण हक्क सांगणार आहे. आमदारांची संख्या कमी असली, तरी नियम आणि घटनेत असं कुठेच लिहिलेलं नाही, की विरोधीपक्ष नेत्याशिवाय संसद आणि लोकसभा चालावी, असं संजय राऊत म्हणाले शिवसेनेचं बळ २० आमदारांचं आहे. याआधी यापेक्षा कमी संख्या असतानाही विरोधीपक्ष नेतेपद मिळालेलं आहे. आमची एकत्रित संख्या ५० च्या वर आहे. त्यामुळे सरकारने विशेषतः विधानसभा अध्यक्ष काल आणि आज तेच आहेत. त्यांना घटना, संविधान याविषयी नक्कीच चाड असावी, असायला पाहिजे. ते विधानसभेत आमची भूमिका मान्य करतील, अशी अपेक्षा संजय राऊत यांनी व्यक्त केली.राज्यातील महाविकास आघाडीपैकी एकाही पक्षाकडे विरोधी पक्षनेतेपदावर दावा करण्याएवढी आमदारांची संख्या नसल्याने महायुती सरकारचे डिसेंबरचे हिवाळी अधिवेशन हे विरोधी पक्षनेत्याअभावी पार पडले. मात्र, आता सोमवारपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उद्धव ठाकरे यांची शिवसेना विरोधी पक्षनेतेपदावर दावा करणार असल्याचे समजते. त्याच वेळी विरोधी पक्षनेता म्हणून कोणाला निवडले जावे, यांचा निर्णय पक्षाच्या नेतृत्वाने पक्षाच्या आमदारांवरच सोपवला असल्याचे समजते.राज्यात नोव्हेंबरमध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दारूण पराभव झाला. तीनही पक्षांना अपेक्षेप्रमाणे कामगिरी करता आली नाही. आघाडीमधील तीनही पक्षांना २८८ पैकी फक्त ४६ जागा जिंकता आल्या. विरोधी पक्षनेतेपदासाठी आवश्यक असणारे १० टक्क्यांचे संख्याबळ एकाही पक्षाकडे नव्हते. उबाठा पक्षाला २०, काँग्रेस १६ आणि शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसला फक्त १० जागा जिंकता आल्या.विरोधी पक्षनेतेपदासाठी २८८ पैकी १० टक्के म्हणजे २९ जागा असण्याची आवश्यकता असल्याचे विधिमंडळातील अधिकाऱ्याचे म्हणणे आहे. मात्र, पुरेसे संख्याबळ नसतानाही विरोधी पक्षनेतेपद दिले जाऊ शकते, सर्व विरोधी पक्षांनी एकत्रित येऊन या पदासाठी उमेदवार दिला तर त्याची निवड होऊ शकते असेही काही अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या सर्व गोंधळात महाविकास आघाडीमध्येही कोणत्या पक्षाकडे विरोधी पक्षनेतेपद जावे यावरून मतभेद असल्याने हिवाळी अधिवेशनात यावर निर्णय झाला नाही. अधिवेशनाच्या शेवटी शेवटी सर्वाधिक २० आमदार असलेल्या उबाठा पक्षाकडून हालचाली सुरू झाल्या होत्या, मात्र कुठे तरी माशी शिंकली आणि विरोधी पक्षनेत्याची नेमणूक झाली नाही अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तोंडावर मात्र



उबाठा पक्षात पुन्हा हालचाली सुरू झाल्या असून पक्षाकडून या अधिवेशनात दावा केला जार असल्याचे समजते. विशेष म्हणजे विरोधी नेता म्हणून कोणाला निवडावे याचा निर्णय उद्धव ठाकरे यांनी आमदारांवर सोपवल्याचे समजते. उबाठाच्या आमदारांमध्ये सध्या याबाबत चर्चा सुरू आहे. यात पक्षाचे ज्येष्ठ आमदार भास्कर जाधव हे प्रबळ दावेदार मानले जात असून, त्यांच्यानंतर प्रतोद सुनील प्रभू आणि आदित्य ठाकरे यांचेही नाव चर्चेत आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर उबाठा पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर पक्षाच्या आमदारांची तसेच पदाधिकाऱ्यांची टप्याटप्याने बैठक बोलावली आहे. सत्ताधारी पक्षाला कात्रीत पकडण्यासाठी काय रणनीती आखली जाईल याबद्दल यात चर्चा करण्यात येणार आहे. मात्र मुख्य चर्चा ही विरोधी पक्षनेता निवडीबद्दल होणार असल्याचेही समजते.

# बुलडाण्यातील तरुणीचे सिनेस्टाइल अपहरण! अट्टल गुन्हेगार अकोल्यात गजाआड!

**जनसंचलन/ बुलढाणा**

बुलडाण्यातील १७ वर्षे १० महिने वय असलेल्या बीएस्सी फर्स्ट इयरच्या विद्यार्थिनीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून छत्रपती संभाजीनगर येथून अपहरण करणाऱ्या कुख्यात गुन्हेगाराला अकोला पोलिसांनी नाट्यमय कारवाईत पकडले. डाबकी रोड पोलिसांनी अकोला शहरातील एसबीआय बँकेसमोर नाकेबंदी करत थरारक सिनेस्टाइल पाठलागात गुन्हेगाराला जेरबंद केले. अपहृत मुलीचे वडील खासगी नोकरी करतात. ते २१ फेब्रुवारीला पत्नी व मुलीसह छत्रपती संभाजीनगर येथील गोगलानी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी गेले होते. मुकुंदवाडी बसथांब्यावर थांबले असताना मुलगी बाथरूमला जात असल्याचे सांगून निघाली. काही क्षणातच ती एमएच २७, बीक्यू ९३३७ क्रमांकाच्या टाटा नेक्सन कारमध्ये ओळखीचा मुलगा अमित बेंडवाल (२२, रा. शहर पोलीस ठाण्यामागे, बुलडाणा) याच्यासोबत जाताना वडिलांना दिसली. त्यांनी थांबवण्याचा प्रयत्न केला, पण अमित कार सुसाट घेऊन पळून गेला. मुलगी बेपत्ता असल्याने वडिलांनी २३ फेब्रुवारीला छत्रपती संभाजीनगर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तत्काळ शोध मोहीम सुरू झाली. बुलडाणा, अकोला, जालना, छत्रपती संभाजीनगर पोलिसांना सतर्क करण्यात आले. अखेर २६ फेब्रुवारीला डायल ११२ वर माहिती मिळाली की, आरोपी अमित मुलीला घेऊन अकोला शहरात जात आहे. डाबकी रोड पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संजय पहुरकर यांच्या पथकाने कारचा पाठलाग सुरू केला. महाशिवरात्री निमित्त गर्दीचा फायदा घेत आरोपी वेगाने निघून जाण्याचा प्रयत्न करत होता. पोलिसांनी चतुराईने दुसरी टीम एसबीआय बँकेसमोर नाकेबंदीसाठी उभी केली. नाकेबंदी पाहूनही अमितने वेग कमी केला नाही. त्याने एका मोटरसायकलला धडक दिली. पोलिसांनी परिस्थिती हाताळत त्याच्या कारसमोर वाहन आडवे लावले. अमितने पोलिसांच्या गाडीवर धडक दिली, मात्र त्याची कार बंद पडली. पोलिसांनी तत्काळ त्याला बाहेर काढून ताब्यात घेतले आणि मुलीची सुखरूप सुटका केली. मुलीला पालकांच्या स्वाधीन करण्यात आले असून अमित बेंडवालला



अटक करून पुढील कारवाईसाठी मुकुंदवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या धडाकेबाज कारवाईबद्दल अकोला पोलिसांचे कौतुक होत आहे. पोलिसांच्या वेगवान आणि शिस्तबद्ध कृतीमुळे एक तरुणी गुन्हेगाराच्या तावडीतून सुटली. ही कारवाई पोलिसांच्या धाडसाचे उत्तम उदाहरण आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नागरी संरक्षण दल आणि स्वयंसेवक!

## संपादकीय लेख

जागतिक नागरी संरक्षण दिन दरवर्षी १ मार्च रोजी साजरा केला जातो. जगातील नागरी संरक्षण, नागरी संरक्षण, नागरी सुरक्षेबाबत लोकांना जागरुक करणे हा त्याचा उद्देश आहे. इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर सिव्हिल डिफेन्स (आईसीडीओ) ही एक आंतरशासकीय संस्था आहे ज्याचा उद्देश नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींच्या प्रसंगी लोकसंख्येचे संरक्षण करणे आणि त्यांना मदत करणे आणि मालमत्ता आणि पर्यावरणाचे संरक्षण सुनिश्चित करणार्या संरचनेच्या राज्यांद्वारे विकासात योगदान देणे आहे. तसेच या दिवशी विविध राष्ट्रीय कार्यक्रम या दिवशी आयोजित केले जातात. अशी रोचक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर लेखातून जाणून घेउया... संपादक.

देशातील नागरिकांचे जीवित, मालमत्ता तसेच नागरी संस्था, उद्योगधंदे, वसाहती इत्यादींचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांच्या स्वयंस्फूर्त सहभागाने व शासकीय साहाय्याने उभारलेली व्यवस्था म्हणजे नागरी संरक्षणव्यवस्था होय. १ मार्च हा जगभरात जागतिक नागरी संरक्षण दिन म्हणून पाळण्यात येतो. शत्रूच्या सैनिकी, घातपाती, प्रचारकी वा तत्सम स्वरूपाच्या आक्रमक आणि विध्वंसक कृत्यांनी देशातील नागरी जीवनाची हानी होऊ शकते. त्याचप्रमाणे राष्ट्रांतर्गत घातपाती कारवायांमुळेही देशातील कायदा व सुव्यवस्था बिघडून नागरी जीवन विस्कळित होऊ शकते. म्हणून आधुनिक काळात नागरी संरक्षण हे राष्ट्राच्या एकूण संरक्षणनीतीचाच एक अविभाज्य असा घटक मानला जातो. नागरी संरक्षणाची पारंपरिक कल्पना ही केवळ प्रतिबंधक उपायांपुरतीच मर्यादित असल्याचे दिसते, तर शत्रूचे आक्रमण आणि विध्वंसक कारवाया यांपासून नागरिकांना झळ पोचू नये या हेतूने प्रतिकारात्मक व प्रतिबंधक अशी दुहेरी व्यवस्था आधुनिक काळात केली जाते. गावाला तटबंदी घालणे हा नागरी संरक्षणाचा एक जुना प्रकार होय. आधुनिक काळात आक्रमणाचे, युद्धाचे आणि देशांतर्गत संघर्षाचे स्वरूप आमूलाग्र बदल्यामुळे नागरी संरक्षणाच्या कल्पनेतही बदल झालेला आहे.

नागरी म्हणजे बिनलष्करी लोकांचे संरक्षण, ही कल्पना आधुनिक काळातील नसून तिचे मूळ प्राचीन काळात सापडते. गावाला तटबंदी घालणे हा प्राचीन काळी सर्वत्र आढळणारा प्रकार नागरी संरक्षणाचाच एक भाग होता. हिंदुस्थानात तथाकथित उच्चवर्णीय लोकांनाच तटबंदीयुक्त नगराच्या आत वस्ती करता येत असे. संकटकाळी मात्र याच तटांच्या आत सर्वांना आश्रय मिळे. अठराव्या शतकापासून युद्धाचे स्वरूप बदलत गेले. ते केवळ रणांगणापुरतेच मर्यादित न राहता नागरी वस्तीपर्यंत फैलावले. नागरिकांवर सतत हल्ले केले, तर नागरिक शेवटी कंटाळून आपल्या राजकर्त्यास शरणागती पत्करण्यास भाग पाडतील, अशी विचारसरणी प्रभावी ठरली. नागरी संरक्षणाचे महत्त्व ओळखून भारत सरकारने ही संघटना उभारली आहे. नागरी संरक्षणाच्या योजना, उपाय व साधने यांसाठी मध्यवर्ती सरकारचे गृहमंत्रालय जबाबदार असून त्यासाठी केंद्रात नागरी संरक्षण प्रसंचालक व त्याचे कार्यालय आहे. प्रसंचालक लेफ्टनंट जनरल या श्रेणीचा सैनिकी अधिकारी असतो. राज्यपातळीवरही नागरी संरक्षण संघटना असून त्यांची संचालयीन कार्यालये असतात. संरक्षण, टपाल व तार, रेल्वे, नागरी व औद्योगिक संस्था यांचे प्रतिनिधी असलेल्या नागरी संरक्षण समित्या प्रत्येक राज्य व जिल्हापातळीवर नेमलेल्या असतात. तसेच मोठ्या शहरात व गावात नागरी संरक्षण दले उभारण्यात आली असून त्यांत कोणाही नागरिकास स्वयंसेवक म्हणून भरती होता येते.

गावाचे पेठावार भाग पाडून त्यांत ठिकठिकाणी वॉर्डन पोस्ट व प्रथमोपचार केंद्रे असतात. स्वयंसेवकांना गस्त घालणे, प्रथमोपचार करणे, आग विझविणे, संकटग्रस्तांची सुटका करणे, वाहतुकीचे नियंत्रण करणे इ. गोष्टींचे प्रशिक्षण दिले जाते. मध्यवर्ती सरकारने नागपूर येथे राष्ट्रीय नागरी संरक्षण महाविद्यालय स्थापन केले आहे. तेथे नागरी संरक्षणाचे उच्च शिक्षण दिले जाते. राष्ट्रीय अग्निशामक सेना महाविद्यालयात अग्निशामक सेवेचे उच्च शिक्षण देण्यात येते. १९७३ अखेर एकूण ४ लक्ष ४ हजार स्वयंसेवक नागरी संरक्षण दलात होते. मध्यवर्ती सरकाराकडून सन १९७३ अखेर २९ लक्ष रुपयांचे अनुदान राज्यांना मिळाले. नागरी संरक्षण संघटनेला पूरक अशी होमगार्ड संघटना प्रत्येक राज्यात काम करते. !! विश्व नागरी संरक्षण दिनाच्या सर्व बंधुभगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# गो. से .महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गौरव गाथा कार्यक्रम संपन्न

**जनसंचलन/ खामगाव**

विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ खामगाव द्वारे संचालित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबईच्या वतीने नुकताच अहिल्यादेवी होळकर गौरव गाथा सांगितमय कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर उपस्थित होते. नवीन पिढीला अहिल्यादेवी होळकर यांचे कार्याची गाथा विचारांचा प्रसार करणे होय हा या कार्यक्रमाचा हेतू होता. या कार्यक्रमाचे नियोजन हिंदी विभागाचे प्रा. डॉ. भरत जवंजाळ यांनी केले होते. याप्रसंगी कार्यकारणी सदस्य संस्कार भारती अमरावती येथील सचिन गिरी सांस्कृतिक संचालनालय प्रतिनिधी म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते.अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर सर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी सांगितीक गौरव गाथा हा शासनाच्या उपक्रम नवीन पिढीला प्रेरणादायी आहे. अशा कार्यक्रमातून अहिल्याबाई होळकर यांनी निर्माण केलेल्या कार्याला उजाळा मिळतो. संपूर्ण हयातीत जवळपास २८ वर्ष इंग्रजांची लढणाऱ्या लढवय्ये राणी म्हणून त्यांची इतिहासात नोंद आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात त्यांनी निर्माण केलेला रणसंग्राम प्रेरणादायी आहे. यावेळी त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या सामाजिक, राजनीतिक आणि कल्याणकारी कार्याबद्दल माहिती दिली. तसेच अहिल्यादेवी च्या कार्याची यशोगाथा सांगीतिक स्वरूपात सादर करणाऱ्या कलाकार चमूचे आभार मानले. सामाजिक संघरचनेत महिलांना नेहमी दुय्यम स्थान देणाऱ्या मानसिकतेला त्यांनी आपल्या कर्तुत्वाने खोडून काढले. समाजात अतिशय प्रतिकूल परिस्थिती आत्मविश्वासाने राज्यकारभार करणारी करणाऱ्या अहिल्यादेवी महिला सक्षमीकरणाची उत्कृष्ट उदाहरण होय असे प्राचार्यांनी प्रतिपादन केले. आजच्या समस्त महिला वर्गांनी यांच्यापासून प्रेरणा घ्यावी असे आवाहन केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी सांगितीक गौरवगाथा सादर करणारे गायक तनुश्री भालेराव त्यांचे सहकारी राजूभाऊ सोनवणे व आफ्टर पेड वादक यश कदम, संगीतकार स्वप्निल कांबळे, संगीतकार स्वप्नील शिरसाट सिंथो साईजरवर, ढोलकी वादक विपुल गवई होते. या संगीतमय




कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. अहिल्याबाई होळकर यांच्या कार्यकर्तुत्वाची संगीतमय झलक या निमित्ताने अनुभवता आली. प्रवीण देशमुख, तसेच सोबत ध्वनी यंत्र व्यवस्थापन सांभाळणारे अशोक शिरसाठ अन्य सहकारी होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनिता कौर यांनी केले. कार्यक्रमाची प्रास्ताविक सांस्कृतिक संचालनालय प्रतिनिधी सचिन गिरी यांनी केले. कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे प्रा. व्हि. यु. मोरे, प्रा. भूतेकर, प्रा. गवई, प्रा .खंदारे, प्रा. कापसे, प्रा. वाघमारे, प्रा. बानाईत, व मोठ्या संख्या विद्यार्थ्यां, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थिती दर्शविली व कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

# अनोळखी मृतदेह आढळला ओळखणाऱ्यांनी संपर्क करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देऊळघाट टोलनाका येथे अंदाजे ३५ वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला आहे. या मृत इसमास ओळखणाऱ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी नामे डॉ शेख युनुस तर्फे कक्ष सेवक विनोद सतीष ढोरमारे (वय २९ वर्ष) रा. बुलडाणा यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन बुलडाणा (ग्रा) येथे मर्ग दाखल केले आहे. त्यामध्ये एक अनोळखी मृतकाच्या अंगामध्ये राखाडी रंगाचे आडव्या लाइनचे कॉलरचे टि शर्ट, राखाड्या रंगाचे हाफ पँट, विटकरी रंगाचे निकर असून मृतकाची दाढी, मिशी तसेच डोक्यावरील केस वाढलेले, डाव्या पायावर गुडघ्याचे खाली जुन्या जखमाचा पांढरा छोटा व्रण, उंची अंदाजे ५.५ फुट उंची असलेला



अनोळखी इसमाचा मृतदेह मिळुन आलेला आहे. या वर्णनाचा इसम पोलीस स्टेशन हद्दीतून हरवीला किंवा कोणी या इसमास ओळखत असल्यास पोलीस स्टेशन, बुलढाणा (ग्रा) येथे संपर्क साधावा. तसेच बुलढाणा ग्रामीण पोलीस ठाण्याच्या ०७२६२-२४१२५५ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा पोलीस उपनिरीक्षक गोकुळसिंग राठोड यांना ९७६५४८६६१४ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सरकारच्या कामावर वॉच ठेवण्यासाठी शरद पवार मैदानात

## आमदार खासदारांना कामाला लावणार, सरकारला घेरणार...



**मुंबई :** मुख्यमंत्री फडणवीसांच्या नेतृत्वातील महायुती सरकारचा कार्यकाळाला १०० दिवस लोटून गेले आहेत. तर मुख्यमंत्र्यांनी आता पुढील १०० दिवसांचा कृती कार्यक्रम जाहीर केला आहे. यानंतर आता राज्यातील ज्येष्ठ नेते राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार ॲक्टिव मोडवर आले आहेत. महायुती सरकारच्या या कृती कार्यक्रमावर वॉच ठेवण्यासाठी त्यांनी पक्षाचे नवे टास्क फोर्स तयार केले आहे. या आमदार आणि खासदारांचे हे टास्क फोर्स असणार आहे. ज्यामध्ये त्यांना विभागनिहाय जबाबदारी देण्यात आली आहे. तर संबंधित विभागातील सरकारच्या कामांवर लक्ष ठेवण्याच्या सूचना पवारांकडून देण्यात आल्या आहेत. खासदार अमोल कोल्हे यांनी याबबत पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली आहे. अमोल कोल्हे म्हणाले, शरद पवार यांनी आज खासदारांची बैठक बोलावली होती. बैठकीत सरकारच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाचं मूल्यमापण करण्यासाठी टास्क फोर्स तयार करण्याचा एकमताने निर्णय झाला. पक्षाने हंड्रेड डेज ट्रॅकिंग टास्क फोर्स तयार केली आहे. सरकारच्या १०० दिवसीय कृती कार्यक्रमावर लक्ष ठेवण्यासाठी शॅडो कॅबिनेट काम करणार आहे.

यासाठी राज्यभरात विभागनिहाय प्रभारींची नियुक्ती करण्यात आली आहे. शरद पवार यांनी प्रभारींना विभागवार महाराष्ट्र पिंजून काढण्याचे आदेश दिले आहेत. याचा संपूर्ण कामांचा तीन महिन्यात अहवाल सादर करण्यास सांगितले आहेअमोल कोल्हे पुढे म्हणाले की, येत्या ७ ते ८ तारखेपासून विभागनिहाय दौरे सुरु होणार आहेत.

यामध्ये वीज दरवाढ, महिलांवरील अत्याचार, पाणीपट्टी वाढ आदी विषयांवर लोकांच्या भूमिका जाणून घेतल्या जातील. दरम्यान यावरुन असे दिसून येते की, पक्षसंघटनावाढीसाठी शरद पवार पक्ष आता सक्रीयतेने पाऊल उचलताना दिसत आहे. पवार यांनी पदाधिकाऱ्यांना नव्या उमेदीनं कामाला लागा, असे आदेशही दिले आहेत.

# कोणताही अत्याचार झाला नाही

## ती मुलगी...गाडेच्या वकिलांचा कोर्टात खळबळजनक दावा...




**पुणे:** स्वारगेट एसटी आगारात २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार करणारा आरोपी दत्तात्रय गाडेला शिवाजीनगर न्यायालयात हजर करण्यात आलं. त्याला १२ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलिसांनी न्यायालयाकडे १४ दिवसांची कोठडी मागितली होती. पण पोलिसांनी त्याला १२ दिवसांची कोठडी दिली आहे. दत्ता गाडेला आज मध्यरात्री दीड वाजता अटक करण्यात आली. त्याला ६८ तासांनी बेड्या ठोकण्यात आल्या. शिरुरमधील गुणाट गावात गाडेचा शोध सुरु होता. आरोपीवर दाखल असलेल्या ६ गुन्ह्यांपैकी ५ गुन्ह्यातील तक्रारदार महिला आहेत. त्यामुळे त्याचा महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन काय आहे ते स्पष्ट होतं. सखोल तपासासाठी १४ दिवसांची पोलीस कोठडी आवश्यक आहे, असा युक्तिवाद सरकारी वकिलांकडून करण्यात आला. या गुन्ह्यामुळे समाजात तीव्र पडसाद उमटले आहेत. त्यामुळे हा गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपचा आहे. आरोपी सराईत असल्याने त्यानं यापूर्वी आणखी काही महिलांना विश्वासात घेऊन त्यांच्यासोबत गैरकृत्य केलेलं आहे का हे तपासायचे आहे, असं वकिलांनी न्यायाधीशांना सांगितलं.आरोपी दत्तात्रय गाडे विरोधात आधीपासून दाखल असलेल्या गुन्ह्यांची माहिती न्यायालयात दिली. आरोपीला मदत करणारे आणखी काहीजण त्याच्यासोबत आहेत का हे तपासायचं आहे. आतापर्यंत या प्रकरणात सीसीटीव्ही फुटेज, गुन्ह्याच्या वेळी वापरलेले कपडे तसेच आणखी काही मुद्देमाल जप्त करण्यात आले आहेत, अशी माहिती सरकारी वकिलांनी दिली.

**आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद काय?**

आरोपीच्या वकिलांनी न्यायालयात धक्कादायक दावा केला. आरोपी आणि फिर्यादी यांच्यात सहमतीने शारीरिक संबंध झाले. कोणताही अत्याचार झालेला नाही. मुलगी स्वत:हून बसमध्ये गेली, असे सनसनाटी दावे गाडेच्या वकिलांकडून करण्यात आले. आमच्या अशीलानं केलेला गुन्हा एवढा गंभीर नाही. पोलिसांनी त्याचं सोशल मीडिया ट्रायल केलं. त्याचा चेहरा टीव्हीवर दाखवण्यात आला, असा युक्तिवाद वकिलांकडून करण्यात आला. गाडेला केवळ २ दिवसांची कोठडी देण्यात यावी, अशी मागणी त्यांच्याकडून करण्यात आली. पण न्यायालयानं त्याला १२ दिवसांची कोठडी सुनावली.

# संतूर मॉम जान्हवी किल्लेकर स्किन केअरसाठी महिन्याला तब्बल इतका करतेय खर्च

## खास औषधाचं करतेय सेवन...



**मुंबई:** अभिनेत्री जान्हवी किल्लेकर बिग बॉस मराठीमुळे घराघरांत पोहोचली. बिग बॉसच्या घरात असताना जान्हवी किल्लेकरच्या स्टाइल, तसंच तिच्या लुकची बरीच चर्चा झाली. आठ वर्षांच्या मुलाची आई असलेल्या जान्हवीला संतूर मम्मा म्हटलं गेलं. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिनं तिच्या स्किन केअरवर महिन्याला किती खर्च होतो होते हे सांगितलं आहे. अभिनेत्रींची लाइफस्टाइल, त्यांच्या कपड्यांचा, मेकअपचा खर्च... या सगळ्यांबद्दल नेहमीच चर्चा होताना दिसते. जान्हवीला नुकत्याच एका मुलाखतीत तिच्या महिन्याच्या खर्चाबद्दल विचारण्यात आलं. यावर तिनं चेहऱ्याच्या स्किन केअरवर महिन्याला ३०-३५ हजार खर्च होत असल्याचं सांगितलं. जान्हवीनं या मुलाखतीत ती चेहऱ्याची काळजी घेण्यासाठी काय काय करते हे सांगितलं. मी स्कीन केअर म्हणून फार काही करत नाही. रोज फेसवॉश लावते. मॉइश्चरायजर पण फार कमी लावते. शूटिंगनंतर घरी आल्यावर बेबी ऑइलने चेहरा पुसते... याशिवाय मी जास्त काही करत नाही, असं ती म्हणाली. सुमन म्युझिक मराठीला मुलाखतीत ती बोलत होती.या स्किन केअर रुटीनसाठी महिन्याला तब्बल ३०-३५ हजारांचा खर्च येत असल्याचं तिनं सांगितलं. जान्हवी म्हणाली की, एक गोष्ट मी रोज सकाळी करते, ती चेहऱ्याला लावत नाही पण त्याचं सेवन करते मी. ग्लूटाथिओन चं रोज सकाळी मी सेवन करते. पण याचाच खर्च जास्त आहे, त्यामुळं त्वचेसाठी जवळपास ३०-३५ हजारांचा खर्च होत असल्याचं जान्हवीने सांगितलं.

जान्हवीच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, ती सध्या अबोली मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. जान्हवी या मालिकेत दिपशिखा हे पात्र साकारत आहे. या पात्राला तिच्या वर्दीचा प्रचंड माज आहे. समोरच्या व्यक्तीला कमी लेखण्याची वृत्ती, विरोधकांना चिरडून टाकण्याचं कसब आणि तिची चौकस बुद्धी यामुळे तिची गुन्हेगारांमध्येच नव्हे तर संपूर्ण पोलीस क्षेत्रात चांगलीच दहशत आहे. लाच घेणं किंवा एखादं बेकायदेशीर काम करणं यात तिला काही गैर वाटत नाही.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मृताच्या एका दानातून मिळू शकते नऊ गरजूंना नवजीवन




दानाचे महत्त्व फार मोठे आहे. अन्नदान, वस्त्रदान वगैरे त्याचे प्रकार आहेत. बदलत्या काळात अवयवदानसुद्धा त्यात आले असून, त्याचे प्रमाण वाढण्याची गरज मात्र आहे. एखाद्या गरजू व्यक्तीला हवे ते देण्याचे समाधान फार मोठे असल्याची जाणीव सर्वांना असते. पण, सध्या देशात लाखो लोक अवयवदात्यांच्या प्रतीक्षेत आहेत. कोणाला हृदय, कोणाला यकृत, कोणाला मूत्रपिंड, तर कोणाला डोळ्यांची गरज आहे. एका मृत व्यक्तीच्या अवयवदानातून किमान नऊ जणांना नवजीवन मिळते हे लक्षात घेतले, तर अवयवदान किती मोलाचे आहे हे लक्षात येईल. संकेतस्थळावरील माहितीनुसार, सध्या देशभरात सुमारे १,०६,००० लोक अवयवदात्यांच्या प्रतीक्षेत असल्याचे दिसते.

अवयव मिळण्याच्या प्रतीक्षेत देशात दरवर्षी सुमारे पाच लाख लोक मरण पावतात. भारतात रस्ते अपघातांत दरवर्षी सुमारे दीड लाख लोक प्राण गमावतात आणि अशा घटनांत सर्वांत आधी मेंदूचे काम थांबते. अशा लोकांचे अवयव दान करता येत असले, तरी जेमतेम दोन ते तीन टक्के भाग्यवंतांनाच ते मिळतात.हे अवयव करता येतात दान...मृत व्यक्तीचे हृदय, फुफ्फुसे, यकृत, मूत्रपिंड, आतडी आणि स्वादुपिंड हे अवयव दान करता येतात. डोळ्यांच्या बाहुलीचा पारदर्शक पडदा हाडांतील नसा, मांसपेशी, स्नायूबंध, अस्थिबंधन, कूर्चा आणि हृदयाच्या झडपाही गरजू रुग्णाला उपयोगी पडतात. जिवंत व्यक्तीचे एक मूत्रपिंड आणि यकृताच्या काही भागाचेही दान करता येते. एका मूत्रपिंडावर दात्याला जगता येते आणि यकृताची वाढ होऊन ते पुन्हा पहिल्या आकारात येते. त्यामुळ दात्याला काही त्रास होत नाही.

अवयवदानाची प्रक्रिया : जिवंत व्यक्ती मूत्रपिंड किंवा यकृत देणार असेल, तर तिची आधी वैद्यकीय तपासणी केली जाते. मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी हे अवयव प्रत्यारोपणासाठी योग्य असल्याचे सांगितल्यावरच पुढील प्रक्रिया सुरू होते. दात्याच्या शरीरातील हे अवयव शस्त्रक्रियेद्वारे काढून घेऊन त्यांचे प्रत्यारोपण करेपर्यंत ते रसायनांत सुरक्षित ठेवले जातात. अवयवदात्याला काही महिन्यांपर्यंत वैद्यकीय निरीक्षणाखाली ठेवले जाते. मृत व्यक्तीच्या मेंदूने काम करणे पूर्णपणे थांबविले असल्याची खात्री आधी करून घेतली जाते.

याबाबतच्या अहवालात ब्रेन स्टेम डेडफ्चे सत्यापन केले असेल, तर मृताच्या नातलगांची परवानगी घेतली जाईल. तोपर्यंत मृताला व्हेंटिलेटवर ठेवतात. कोणत्या रुग्णाला कोणता अवयव हवा आहे याबाबत प्रतीक्षा यादी तपासली जाऊन रुग्णाला सूचना देऊन संबंधित रुग्णालयात आणले जाऊन अवयव प्रत्यारोपण केले जाते.नंतर मृताचे पार्थिव नातलगांकडे दिले जाते.

अंतिम अनुमती : ब्रेन डेडघोषित केल्यानंतर प्रत्यारोपण करण्याबाबतचा निर्णय पूर्णपणे मृताचे निकटवर्तीय आणि नातलगांचा असतो.संबंधित व्यक्तीने जिवंत असताना आपल्या मृत्यूनंतर आपले अवयवदान करावे, असे जाहीर केले असले, तरी नातलगांनी अनुमती देईपर्यंत अवयवदान करता येत नाही. मेडिको लीगलप्रकरणांत अवयवदानापूर्वी पोलिसांच्या एनओसीफ्ची गरज असते. अवयवदानापूर्वी मृत्यूनंतरच्या औपचारिकता पूर्ण करण्यासाठी शरीर फॉरेन्सिक तज्ज्ञांकडे पाठविले जाते.न डेडतरतूद : माणसाच्या मेंदूने प्रतिक्रिया देणे बंद करणे, मेंदूद्वारे संचलित होणाऱ्या सर्व क्रिया बंद होणे ही ब्रेन डेडची स्थिती असते. पण, व्हेंटिलेटरच्या माध्यमातून शरीरातील काही अवयव काही काळ जिवंत ठेवता येतात. पण, या स्थितीत पुन्हा जीवन मिळणे फार कठीण असते. त्यामुळे अवयव दानाच्या हेतूसाठी १९९४ मध्ये तयार करण्यात आलेल्या मानव अंग आणि ऊतक प्रत्यारोपण अधिनियमांतर्गत अवयवदान करणाऱ्या व्यक्तीचे ब्रेन डेडप्रमाणपत्र अनिवार्य असते. घरात किंवा अन्यत्र हृदयविकाराच्या झटक्यामुळे मरण पावलेली व्यक्ती अवयवदान करू शकत नाही. कारण, हृदयाचे काम थांबविल्यावर काही मिनिटांतच मृताच्या शरीरातील सर्व अवयव काम करणे बंद करतात आणि असे शरीर अवयवदानासाठी उपयोगी पडत नाही.रुग्णालयात मृत्यू झालेल्या आणि डॉटरांनी ब्रेन डेडप्रमाणित केले असेल, तर अशा व्यक्तीचे अवयव कृत्रिम माध्यमातून सक्रिय ठेवून त्यांचा उपयोग प्रत्यारोपणासाठी वापर करता येतो. कृत्रिमरीत्या सक्रिय ठेवलेले अवयव विशिष्ट कालावधीत वापरावे लागतात. त्यात मृत व्यक्तीचे हृदय आणि फुफ्फुसे चार ते सहा तासांच्या आत, यकृत सहा ते बारा तासांत, मूत्रपिंड ३० तासांत आणि स्वादुपिंड सहा तासांच्या आता वापरावे लागते.

अवयवदानाबद्दल मृताच्या नातलगांना काहीही पैसे दिले जात नाहीत, तसेच रुग्णाकडूनही काही पैसे घेतले जात नाहीत. अवयवदान करणे, अवयव काढून घेऊन पुन्हा शस्त्रक्रिया करण्याचा खर्च रुग्णालयेच करतात.

# बसल्याजागी व्यायाम करून घ्या

बहुतेकजण व्यायाम करण्याचे ठरवतात; पण आळसापोटी रोज टाळत असतात. पण, आता असे करण्याचे कारण नाही. काही व्यायाम बसून सहजतेने करता येऊ शकतात.हे सोपेही आहेत व परिणामकारकही.

खांदे व मानदुखीपासून आराम : खुर्ची वा स्टुलावर आरामात बसा. दोन्ही तळहात खांद्यांवर ठेवा. या स्थितीत डावीकडे व उजवीकडे वळा.आता १ मिनीट सतत अशाप्रकारे डावीउजवीकडे वळत राहावे. नियमितपणे हा व्यायाम केल्यास खांदे व मानदुखीपासून आराम मिळतो. तसेच, ब्राउन फॅटसेल्सही सक्रिय होतात व कंबरेजवळील चरबीही कमी होते.

पोश्चर नेटका राहील : सरळ बसून पोटाखाली दोन्ही तळहात ठेवा. या स्थितीत राहात कंबरेतून प्रथम उजवीकडे व नंतर डावीकडे वळा. हा सतत १ मिनीट करीत राहा. नियमितपणे केल्यास कण्याच्या खालच्या भागात लवचिकपणा येतो व पोश्चरही नेटका राहतो.

कंबर राहील सुडौल : स्टूल वा बिनहाताच्या खुर्चीत बसावे. सरळ बसून कंबरेवर दोन्ही हात ठेवावेत. आता या स्थितीत राहत डावी-उजवीकडे वळायचे आहे. हे सतत १ मिनीट करा. नियमितपणे केल्यास कंबरेच्या आजूबाजूचे स्नायू, तर मजबूत होतीलच. शिवाय पोट व कंबरेची जादा चरबीही कमी होईल.लक्षात ठेवा की, हा करताना पाठीचा कणा एकदम ताठ ठेवायचा आहे. वाकून बसायचे नाही.

पोटाची चरबी कमी होईल : सरळ बसत आपल्या दोन्ही हातांची बोटे एकमेकांत अडकवा. आता कंबरेतून प्रथम उजवीकडे व नंतर डावीकडे वळा. वळताना हातही वळवायचे आहेत. व्यायाम सतत १ मिनीट करावा.नियमितपणे हा केल्यास पोटाजवळ साचलेली चरबी नष्ट होत असते. लक्षात ठेवा की झटयात न वळता सावकाश आरामात वळायचे आहे.

स्नायूंना मिळेल बळकटी : सरळ बसावे व दोन्ही तळहात डोयावर ठेवावेत. याच स्थितीत राहात कंबरेतून उजवीकडे व नंतर डावीकडे वळा.असे सतत ५० ते ६० सेकंद करा, या व्यायामाने बगलेतील स्नायू मजबूत होतात व खांद्याजवळील जादा चरबीही कमी होते. या व्यायाम रोज १ ते २ मिनिटे करावा.



# मुळ्याची पानं गुणकारी

**मुळ्याच्या पानांमध्ये लोह खूप अधिक प्रमाणात असते.म्हणून त्यांचं सेवन खूप अधिक प्रमाणात करा. यामुळे शरीराची त्वचा मुलायम होते. मुळ्याच्या पानांचा रस पचनक्रियेमध्ये वृद्धी करतो. मुळ्याच्या मऊ पानांवर सैंधव मीठ लावून खाण्याने मुखदुर्गंधी दूर होते.**

# कोरियन मुली काचेसारख्या त्वचेसाठी वापरतात ही पांढरी गोष्ट, चेहऱ्याचे डाग होतील गायब...





तांदळाचे पाणी केवळ आरोग्यासाठीच नाही तर त्वचा आणि केसांसाठी देखील फायदेशीर आहे. वजन वाढवण्यासाठी अनेकदा लोक तांदळाचे पाणी पितात. त्याच वेळी, तांदळाचे पाणी फेस पॅक किंवा क्लींजर म्हणून देखील वापरले जाते.

याशिवाय, तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही तांदळाच्या पाण्याने तोंड देखील धुवू शकता. तांदळाच्या पाण्यात अँटीऑक्सिडंट आणि वृद्धत्वविरोधी गुणधर्म असतात, जे त्वचेसाठी खूप महत्वाचे आहेत. खरं तर, तुम्ही दिवसाच्या कोणत्याही वेळी तांदळाच्या पाण्याने तुमचा चेहरा धुवू शकता. पण, जर तुम्ही दररोज सकाळी तांदळाच्या पाण्याने चेहरा धुतलात तर दिवसभर तुम्हाला ताजेतवाने वाटेल. तांदळाचे पाणी त्वचेशी संबंधित अनेक समस्या देखील दूर करते. चला, तांदळाच्या पाण्याने चेहरा धुण्याचे फायदे जाणून घेऊया.

**त्वचा डागरहित होईल**

तांदळाच्या पाण्याने चेहरा धुतल्याने त्वचा डागरहित होते. जर तुमच्या चेहऱ्यावर डाग किंवा टॅनिंग असेल तर तांदळाच्या पाण्याने चेहरा धुणे फायदेशीर ठरू शकते. तांदळाच्या पाण्यात अॅलँटोइन असते, जे त्वचेची दुरुस्ती करण्यास मदत करते. तांदळाचे पाणी चेहऱ्यावरील डाग देखील दूर करते.

**त्वचेची चमक वाढवा**

जर तुमची त्वचा निस्तेज आणि निर्जीव असेल तर तुम्ही तांदळाच्या पाण्याने चेहरा धुवू शकता. तांदळाच्या पाण्यात अँटीऑक्सिडंट गुणधर्म आढळतात, ज्यामुळे त्वचेची चमक वाढते. अँटीऑक्सिडंट्स त्वचेला मुक्त रॅडिकल्सपासून देखील वाचवतात. तांदळाच्या पाण्याने चेहरा धुतल्याने त्वचेची चमक आणि रंगत वाढते .

**त्वचा मऊ करते**

जर तुमची त्वचा कोरडी असेल तर तांदळाचे पाणी फायदेशीर ठरू शकते. तांदळाचे पाणी त्वचेचा कोरडेपणा कमी करते. तांदळाच्या पाण्याने चेहरा धुतल्याने त्वचा मऊ आणि कोमल होते. जर तुम्ही तांदळाच्या पाण्याने चेहरा धुतलात तर तुमची त्वचा मऊ आणि चमकदार होईल.

**मुरुमांपासून मुक्तता मिळवा**

मुरुमांच्या त्वचेसाठीही तांदळाचे पाणी फायदेशीर आहे. जर तुमच्या चेहऱ्यावर मुरुमे किंवा पिंपल्स असतील तर तुम्ही तांदळाच्या पाण्याने चेहरा धुवू शकता. तांदळाचे पाणी त्वचेवरील मुरुम निर्माण करणारे बॅक्टेरिया मारते. दररोज तांदळाच्या पाण्याने चेहरा धुवून तुम्ही मुरुमांपासून मुक्त त्वचा मिळवू शकता. तांदळाचे पाणी वृद्धत्व रोखणारे एजंट म्हणून काम करते. जर लहान वयातच तुमच्या चेहऱ्यावर सुरकुत्या आणि बारीक रेषा दिसू लागल्या तर तुम्ही तांदळाचे पाणी वापरू शकता. तांदळाच्या पाण्याने चेहरा धुतल्याने सुरकुत्या येण्याची समस्या कमी होते. तांदळाचे पाणी त्वचेला तरुण ठेवण्यास मदत करते.

# कधीच येणार नाही हार्ट अटॅक...

# हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर हरेश मेहतांनी सांगितलेले हे ५ उपाय करा, एकदम टकाटक राहील हृदय...

आज हृदयरोग हा जगभरातील मृत्यूचे प्रमुख कारण बनले आहे. चुकीची जीवनशैली आणि अयोग्य आहार यामुळे जगभरातील लोकांची हृदय कमकुवत होत चालली आहे. यावर उपाय काय, हा प्रश्न अनेकजण विचारतात. तुम्हालाही हा प्रश्न पडत असेलच. तर यावर उत्तर एकच ते म्हणजे लहान-लहान पण सातत्याने केलेले जीवनशैलीतील बदल हृदयाचे आरोग्य सुधारू शकतात. अनेकांना वाटते की हृदयरोग टाळण्यासाठी मोठ्या प्रमाणात बदल आवश्यक आहेत, पण प्रत्यक्षात, छोटे -छोटे, जीवनशैलीतील बदल दीर्घकाळ परिणामकारक ठरतात. प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. हरेश मेहता, सल्लागार पी.डी. हिंदुजा हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर, खार, मुंबई यांनी यावरच एक मार्गदर्शनपर माहिती दिलेली आहे. जी आपल्यासाठी नक्कीच फायद्याची ठरू शकते.

**लहान सवयी, मोठा प्रभाव**

आपली हृदयाची धडधड दररोज १,००,००० वेळा होते आणि आपले हृदय सुमारे २,००० गॅलन रक्त पंप करते. आपल्या रोजच्या जीवनशैलीत चुकीच्या सवयींमुळे हृदयावर नकारात्मक परिणाम होत असतो, जसे की जास्त साखर सेवन करणे, तासनतास बसून राहणे किंवा वेळेवर आरोग्य तपासण्या टाळणे. यामुळे हळूहळू हृदयविकाराचा धोका वाढतो. याउलट, लहान सकारात्मक सवयी हृदयाचे आरोग्य लक्षणीयरित्या सुधारू शकतात. संशोधन दर्शवते की योग्य आहार, नियमित व्यायाम आणि मानसिक तणावावर नियंत्रण ठेवणे यामुळे रक्तदाब नियंत्रित राहतो, कोलेस्ट्रॉल चे प्रमाण कमी होते आणि हृदय निरोगी राहते.

स्मार्ट आहार : हृदय मजबूत ठेवण्याचा सोपा मार्ग

हृदय निरोगी ठेवण्यासाठी आहाराकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. यासाठी आपल्या आवडत्या पदार्थांचा त्याग करण्याची गरज नाही, तर फक्त काही स्मार्ट पर्याय निवडणे महत्त्वाचे आहे.

**अधिक हालचाल, कमी बसणे**

शारीरिक निष्क्रियता ही हृदयरोगाची मोठी कारणांपैकी एक आहे. पण यावर उपाय म्हणून खूप कठीण व्यायाम करण्याची गरज नाही. दैनंदिन जीवनात छोटे बदल करूनही हृदय निरोगी ठेवता येते. मानसिक तणावावर नियंत्रण ठेवणे आवश्यक तणाव, चिंता आणि झोपेच्या समस्या हृदयाच्या आरोग्यावर वाईट परिणाम करतात. दीर्घकालीन तणावामुळे




रक्तदाब वाढतो आणि हृदयविकाराचा धोका वाढतो. हे टाळण्यासाठी काही सोपे उपाय करणे फायदेशीर ठरतात.

**नियमित आरोग्य तपासणी**

अनेक हृदयविकार सुरुवातीला कोणतीही लक्षणे न दाखवता विकसित होतात. म्हणूनच, नियमित आरोग्य तपासणी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हृदयाचे आरोग्य आपल्या सवयींवर अवलंबून असते. लहान-लहान बदल जसे की बटाट्याच्या चिप्सऐवजी सॅलड निवडणे, लहान अंतर चालत जाणे, पुरेशी झोप घेणे आणि तणाव व्यवस्थापन करणे, हे सगळे मिळून मोठा सकारात्मक परिणाम करू शकतात.आपण एकाच वेळी संपूर्ण जीवनशैली बदलू शकत नाही, पण एक छोटा बदल आजपासून सुरू करा.

# चॅम्पियन्स ट्रॉफीत मोठा धक्का, इंग्लंडच्या कर्णधाराचा तडकाफडकी राजीनामा, कोण होणार नवा कॅप्टन...

**दुबई :** चॅम्पियन्स ट्रॉफी सुरु असताना इंग्लंडच्या कर्णधाराने आता तडकाफडकी राजीनामा दिला आहे. क्रिकेट जगतासाठी ही धक्कादायक गोष्ट असून आता इंग्लंडचा नवा कर्णधार कोण याची आता जोरजार चर्चा सुरु झाली आहे. पण इंग्लंडच्या संघाने याचे उत्तर शोधून काढले असून इंग्लंडचा नवा कर्णधार होण असेल, हे आता स्पष्ट झाले आहे. इंग्लंडला अफगाणिस्तानकडून लाजीरवाणा पराभव पत्करावा लागला होता. त्यानंतर आता इंग्लंडचा कर्णधार जोस बटलरने आपल्या पदाचा राजीनामा दिली आहे. त्यामुळे आता इंग्लंडचा पुढचा कर्णधार कोण असणार, याची चर्चा सुरु झाली आहे. पण आता इंग्लंडचा पुढचा कर्णधार हा हॅरी ब्रुक्स असणार आहे. कारण हॅरी हा इंग्लंडच्या संघाचा उप कर्णधार आहे आणि तो आता बटलरनंतर संघाची धुरा सांभाळू शकतो.इब्राहिम झाद्रानने चॅम्पियन्स करंडक वनडे क्रिकेट स्पर्धेतील सर्वाधिक वैयक्तिक धावा करण्याचा पराक्रम करताना १७७ धावांचा चोप दिला. त्यास जो रुटने फटकेबाज शतक करून प्रत्युत्तर दिले. मात्र रुटला सहकाऱ्यांची पूर्ण साथ लाभली नाही, त्यामुळे अफगाणिस्तानने चॅम्पियन्स करंडक वनडे क्रिकेट स्पर्धेत इंग्लंडचा आठ धावांनी पराभव केला आणि उपांत्य फेरीच्या आशा कायम राखल्या. त्याचवेळी भारतीय उपखंडातील सलग पाचव्या वनडे पराभवामुळे इंग्लंड साखळीतच बाद झाले. झाद्रानने विक्रमी खेळी करताना आपली उच्च तंदुरुस्तीही अधोरेखीत केली. त्याने केवळ १७७ धावांची खेळीच केली नाही, तर या सलामीवीराने ४६व्या षटकांत चारवेळा दोन धावा घेत एकूण दहा धावा धावत आपली उच्च तंदुरुस्तीही अधोरेखीत



केली. चॅम्पियन्स स्पर्धेत बेन डकेटने केलेला सर्वाधिक १६५ धावांचा विक्रमही त्याने सहज मागे टाकला. झाद्रान सोडल्यास अफगाणिस्तानच्या तिघांनी चाळीशी पार केली होती.जो रुट सोडल्यास इंग्लंडचाही एकही फलंदाज अर्धशतक करू शकला नाही. पण रुटने बेन डकेटसह ६८, हॅरी ब्रूकसह ३५, जोस बटलरसह ८३ आणि जेमी ओव्हरटनसह ५४ धावांची भागीदारी करीत इंग्लंडचे आव्हान कायम ठेवले. जोफ्रा आर्चरचा प्रतिहल्ला कमी पडला आणि इंग्लंडला अखेरच्या षटकात विजयासाठी १३ धावांची गरज निम्मा संघ बाद केलेल्या ओमरझाईने अफगाणिस्तानला विजयी केले.

# देव माणसात शोधावा




सोशल मीडिया हल्ली आपल्या जगण्याचा अविभाज्य अंग बनत चाललाय. रोटी, कपडा, मकान, टूव्हीलर और मोबाईल जीवनावश्यक गरजा झाल्या आहेत. खूप छान वाचनीय, महत्वपूर्ण माहिती व्हॉट्सॲपवर येत असते. आवश्यक त्या पोस्ट जरूर वाचायला हव्या, पण त्यातलं काय घ्यावं, काय घेऊ नये हे मात्र आपल्या स्वत:च्या विचारांच्या कसोटीवर ठरवावं. काही दिवसांपूर्वी एक पोस्ट आली होती, ज्याने गरज नसतानाही विचारचक्र फिरवले. आतल्या आत विचारांची घुसळण सुरू होती. कुठे तरी ते विचार मनाला अस्वस्थ करत होते आणि त्या दोन-तीन दिवसांपासून वर्तमानपत्र आणि व्हॉटसॲपमध्ये जागा व्यापणारी बातमी पुन्हा विचार करायला भाग पाडणारी.

पाथखट- मूर्तीकार एखाद्या ओबडधोबड दगडाला हेरून छिन्नी-हतोडीने कष्टपूर्वक त्यातून सुंदर मूर्ती निर्माण करतो, मग त्या मूर्ती देवदेवता, महान व्यक्ती, माणसे, जनावरे, पक्षी कशाच्याही असोत. आवश्यकतेनुसार त्या-त्या जागी स्थापना करून माणसे त्याच्या चहुबाजूने बाजार उभा करतात. मंदिरात माणूस माणसाने घडवलेली मूर्ती देवदेवता म्हणून स्थापन करतात. श्रद्धेने पूजतात, शरण जातात, सुख-दु:ख सांगतात. श्रद्धा माणसांना बळ देणारी, सकारात्मक ऊर्जा देणारी असेल, तर कोणालाही अडचण वाटण्याचे कारण नाही. शेवटी श्रद्धा ही ज्याची-त्याची वैयक्तिक बाब आहे. मात्र, त्या श्रद्धेत दुराग्रह आणि अहंकाराचा शिरकाव झाला, तर मात्र समोरच्याची श्रद्धा द्वेषास पात्र होऊ शकते. रस्त्याच्या कडेला असणारं एखादं छोटसं मंदिरही त्याच देवाचं आणि प्रचंड मोठी वास्तू, साग्रसंगीत पूजा, पुजारी बडवे, आसपासची दुकानं-बाजार असा लवाजमा उभा राहिला की, आतल्या देवाचा मान वेगवेगळा का होतो? आपली श्रद्धा नक्की कोणावर, असा प्रश्न खरं तर आपण स्वत:ला त्यावेळी विचारायला हवा आणि याचंही भान राखायला हवं की, मानवनिर्मित देव मोठा की, देवनिर्मित माणूस मोठा.

अशा लवाजम्यात एकदा देव स्थानापन्न झाला की, देव भक्तांना पारखा होतो. देव आणि भक्तांच्या मध्ये न दिसणारी भिंत उभी राहते, जणू देवावरच बंदी-नियंत्रण येतं. देवाने कोणाला भेटावे, कोणाला भेटू नये, वेळ कोणाला किती असावा, त्याची किंमत काय असावी, वा असू नये हे देवाला बंदिवान करणारे त्याचे सेवकरूपी मालक ठरवतील. चरणस्पर्श करण्यासाठी नियम इतकेच असते, तर कदाचित ठिक म्हणता आले असते, पण धर्म-लिंग भेद हे देवासाठी नसून माणसांच्या दुराग्रहासाठी असतील, तर मात्र श्रद्धेची जागा द्वेष घेईल हे नाकारता येत नाही.

भारताचे प्रथम नागरिक, राष्ट्रपती रामनाथ कोविंद सपत्नीक देवदर्शनाला जातात आणि केवळ त्यांना जातीच्या कारणाने प्रवेश दिला जात नाही. त्यांच्या पत्नीला धक्काबुक्की होते, हे वाचून प्रश्न पडतो की, व्यक्तिपेक्षा धर्म मोठा का? स्त्रीदाक्षिण्य, स्त्रियांचा आदरसन्मान विसरला जावा का? कारण केवळ जात हे कारण इतके प्रभावी की, त्यासमोर सामान्य नागरिक आणि देशाचे राष्ट्रपती एका रांगेत यावेत! जिथे देशाच्या राष्ट्रपतींची ही अवस्था तिथे आम नागरिकांची काय बिशाद वर्णावी? पण, काहीही म्हणा आम्ही भारतीय समोर अस्तित्वात असणा-या वास्तवापेक्षा न दिसणा-या धर्माच्या अभिमानापोटी मंदिर-मस्जीद प्रवेशच काय, एकमेकांची डोकी फोडायला. मुद्दे पाडायला कधीही तयार होतो. गाभा-यातल्या देवाला किंवा मजारीतल्या पिराला काहीही आक्षेप नसतो, पण त्याचे सेवेकरी जणू त्याच्यामार्फत पॉवर ऑफ ॲटर्नी असल्यासारखे वागतात. आश्चर्य तर याचे होते की, एखाद्या सडक्या मेंदूत ही कीड असेल असे समजावे, तर आसपासची असंख्य डोकी त्याच्याच तालावर नाचतात. एखादा असा असावा हे समजण्यासारखे आहे. पण इतरही त्याचीच री ओढून झुंडीने धार्मिक दहशत माजवून आपला दुराग्रह समाजावर लादतात. हे संतापजनक आहे.

मागच्या वर्षी हाजीअली दर्गा प्रवेशासाठी स्त्रीवादी संघटना आणि महिला कार्यकर्त्यांनी दर्गा प्रवेशासाठी थेट उच्च न्यायालयाचे दार ठोठावून कायदेशीर लढाई लढल्याचे प्रकरण गाजले होते. त्याचबरोबर शनीमंदिर प्रवेश मुद्दाही गाजला. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी छोटे-मोठे शनीमंदिर आहेत. शनिवारी भक्तांची भलीमोठी रांग लागते. स्त्री-पुरुष शिस्तीत दर्शन घेत असतात. पण, शिंगणापूरलाच महिलांना प्रवेश का नसावा.

एप्रिल महिन्यात पर्यटनानिमित्त कर्नाटक राज्याच्या कारवार जिल्ह्यात गेले असताना, आलेला अनुभव सुखद होता. सदाशिवगड नावाच्या भागात हजरत शमशुद्दीन चिश्ती साहेबांच्या प्रसिद्ध दर्ग्याला भेट देण्याचा योग आला. खूप मोठा आणि शानदार दर्गा आहे. तिथे अगदी मजारीपर्यंत महिलांना सहज प्रवेश होता. मुस्लिमच नव्हे तर मुस्लिमेतर महिलांनी मुजावरच्या सांगण्याने चादर आणि शेरा चढवला. मजारी शेजारी बसून प्रार्थना केली. मुजावरने फातिहा पढून दोन्ही बाजूला थांबलेल्या पुरुष आणि महिलांच्या सिरावर मोडशल ठेवली.

साधकांना त्यांच्या आराध्यापासून दूर ठेवण्यासाठी लिंगभेद आणि जातीभेद ही दूषित मानसिकता काही माणसांची असते. विरोध व्हावा या मानसिकतेला संघर्ष व्हावा अशा मानसिकतेविरुद्ध तरी शेवटी मनाच्या तळाशी प्रश्न उरतोच, मंदिर-मस्जीद प्रवेशासाठी भांडण्यात, कोर्टकचे-या करण्यात आपली ऊर्जा, वेळ का घालवावा? माणसामाणसात भेदाभेदी करण्याला निमित्त ठरणा-या या कारणांनाच का वाळीत घालू नये. नाही तरी आपला संघर्ष आपणच करायचा असतो. श्रद्धा फक्त बळ देते. देव फक्त आशीर्वाद देतो म्हणतात. कर्म तर आपणच करणार आहोत. मग कशाला हवी ही बेगडी औपचारिकता!

# केंद्रीय राज्यमंत्री यांच्या हस्ते राजमाता महोत्सवचा शुभारंभ...

## बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळण्यासाठी प्रयत्नशिल - ना.प्रतापराव जाधव

जनसंचलन/बुलढाणा

राजमाता महोत्सवाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता समूहातील महिलांना कर्तृत्व व कौशल्य दाखविण्यासाठी उत्तम व्यासपीठ मिळाले असून त्यांचा महिलांनी लाभ घ्यावा. तसेच बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी आज येथे दिली. ग्रामविकास व पंचायत राज विभाग, उमेद या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातर्फे जिजामाता प्रेक्षागार क्रीडा व व्यापारी संकुल येथे राजमाता विभागस्तरीय सरस तथा बुलढाणा जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनीचा शुभारंभ केंद्रीय राज्यमंत्री ना. जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार संजय गायकवाड, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, अतिरिक्त मख्य कार्यकारी अधिकारी बि.एम. मोहन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद एंडोले, आशिष पवार, विक्रांत जाधव, राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे प्रकल्प संचालक राजेश इंगळे, मुख्य लेखाधिकारी प्रकाश राठोड आदी उपस्थित होते. केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की, केंद्र व राज्य शासन विविध योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी काम करीत आहे. जोपर्यंत महिला स्वावलंबी होणार नाही तोपर्यंत देशाचा संपूर्ण विकास होणे शक्य नाही. महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाली तरच तिची समाजात स्वतंत्र ओळख निर्माण होते. त्यामुळे महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून खाद्यपदार्थ, सजावटी वस्तू, साहित्य निर्मिती, खेळणे अशा विविध उत्पादनाची निर्मिती करावी. उत्पादीत केलेले वस्तू, पदार्थांची विक्री स्थानिक ठिकाणी, तालुका व शहरी भागात विक्री करावी. केवळ वस्तू उत्पादनावर भर न देता वस्तूची पॅकींग, मार्केटिंग व ब्रँडींगवर भर द्यावा. यासाठी घरोघरी जाऊन आपल्या मालाची माहिती ग्राहकापर्यंत पोहोचवावी, असेही ते यावेळी म्हणाले. पुढे ते म्हणाले की, बुलढाणा जिल्ह्यासाठी ६३ हजार घरकुल मंजूर झाले असून यामुळे जिल्हयातील पात्र गरजू लाभार्थांचे घराचे स्वप्न पूर्ण होणार असून कोणीही घरापासून वंचित राहणार नाही. तसेच बचत गटासाठी शासन अल्पदरात कर्ज उपलब्ध करुन देत आहे. तसेच बचत गटांचा समूह तयार करुन मोठे उद्योग निर्मितीसाठी केंद्र शासनामार्फत ५० लाखापर्यंत कर्ज पुरवठा बचत गटांना दिल्या जात आहे. याचा लाभ महिलांनी घ्यावा, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, राजमाता महोत्सव विक्री व प्रदर्शनी महिला बचत गटासाठी पर्वनी असून उत्पादीत केलेल्या वस्तू व पदार्थ ग्राहकापर्यंत पोहोचविण्यास मदत होणार आहे. बचत गटांना सक्षम करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून निधी




उपलब्ध करुन दिल्या जात आहे. महिलांनी खाद्य पदार्थ निर्मिती करण्यापर्यंत सिमींत न राहता लोकांच्या आवडीनुसार वस्तू तयार कराव्या, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव यांनी राजमाता महोत्सव प्रदर्शनीतील विविध स्टॉल्सला भेटी देऊन स्टॉलधारक महिलाभगिनींशी संवाद साधला. येथे गृहपयोगी वस्तू, मिलेट्स उत्पादने, बांबूच्या वस्तू, धान्य, विविध शासकीय दालने, विविध खाद्यपदार्थ आदी स्टॉल्स लावण्यात आले असून हा महोत्सव दि. ४ मार्चपर्यंत सुरु राहणार आहेत. ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे प्रकल्प संचालक राजेश इंगळे यांनी प्रास्ताविक केले. चारुशिला माळोदे व गजानन कंकाळे यांनी संचालन तर आभार आशिष पवार यांनी मानले. राजमाता महोत्सवात बचत गटांची उत्पादने, खाद्यपदार्थ, वस्तू यांची १५० हून अधिक दालने असून, रोज सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमही होणार आहे. या भव्य प्रदर्शनी व विक्री महोत्सवाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# आमदार धिरज लिंगाडे यांच्या स्थानिक विकास निधीतून १ कोटी १० लक्ष रुपयाचे शैक्षणिक साहित्याचे वाटप

## जिल्ह्यातील शाळेत यापेक्षाही उत्कृष्ट दर्जाचे साहित्य दरवर्षी वाटप करु : आ. धिरज लिंगाडे

जनसंचलन/बुलढाणा

अमरावती पदवीधर मतदारसंघाचे आमदार धीरज लिंगाडे यांच्या स्थानिक विकास निधीतून १ कोटी १० लक्ष रुपयाचे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. आज (दि.२८) फेब्रुवारी रोजी बुलढाणा येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात आमदार धीरज लिंगाडे यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील १२० शाळांना हे साहित्य वाटप करण्यात आले. जिल्ह्यातील शाळेत यापेक्षाही उत्कृष्ट दर्जाचे साहित्य दरवर्षी वाटप करु, असे आमदार धिरज लिंगाडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी व्यासपिठावर अमरावती पदवीधर मतदारसंघाचे आमदार धीरज लिंगाडे, काँग्रेस कमेटीचे जिल्हाध्यक्ष माजी आ. राहुल बोंद्रे, सर्वश्री श्यामभाऊ उमाळकर, लक्ष्मणराव घुमरे, प्रकाश पाटील, दिलीप जाधव, नरेश शेळके, मगलाताई पाटील, स्वातीताई वाकेकर, प्रा.डॉ. निलेश गावंडे, सतिष मेहेंद्रे, प्राचार्य सुनिल जवंजाळ, डी.डी. वायाळ, शैलेश खेडेकर, रवि पाटील, प्रा. अशोक खोरखेरे, विजय गवारगुरु, टेंबरे, ॲड. विजय सावळे उपस्थित होते. पुढे आ. धिरज लिंगाडे म्हणाले की, गेल्या मागील पाच वर्षामध्ये प्राथमिक, जिल्हा परिषद, माध्यमिक शिक्षकांचे प्रश्न असतील त्या-त्या ठिकाणी बैठका घेवून त्या शिक्षकांच्या समस्या सोडविण्याचे काम प्रामुख्याने करित आहोत. विधानसभेच्या दोन ते तीन महिने पहिले शासनाने शंभरच्या वर जिआर काढले आहे. त्यामध्ये २० टक्के ४० टक्के पगारावर काम करीत आहे. त्यांना फक्त टप्पा अनुदान मंजुर करण्याची घोषणा केली. मागील हिवाळी अधिवेषणातही ही पुरवणी मागणी फेटळण्यात आली. शिक्षकांच्या मागण्यांसाठी सतत लढा देत राहणार. आपल्या ज्या काही समस्या असतील त्याचे निवेदनाद्वारे आम्हाला सादर करा, येणा-या अधिवेषामध्ये शिक्षकांच्या मांगण्या मांडणार आहे. मागच्या वर्षी २०२३-२०२४ अमरावती विभागामध्ये ४०० शाळांना डिजीटल स्क्रीन दिल्या आहेत. यामध्ये ज्या शाळेची संख्या एक हजार आहे, अशा शाळा पात्र ठरल्या आहे. आपल्याला निधी कमी आणि काम जास्त आहे. त्यामुळे जेव्हढा निधी आपल्याला मिळेल, अधिकाधिक निधी कसा मिळेल याचा सातत्याने प्रयत्न करणार आहे. जिल्ह्यातील आमच्या शिक्षणसंस्था कशा जतन करता येईल असे प्रयत्न करु, असे शिक्षक आमदार धिरज लिंगाडे यांनी सांगितले. यावेळी काँग्रेस कमेटीचे जिल्हाध्यक्ष माजी



आ. राहुल बोंद्रे, श्यामभाऊ उमाळकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यानंतर कम्प्युटर, आरो, प्रिंटर, खुच्र्या, डेक्स बेंच या साहित्यांचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या उपस्थित करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य सुनिल जवंजाळ यांनी तर संचालन प्रा. सुनिल सपकाळ यांनी केले. कार्यक्रमाअंती जिल्ह्यातील १२० शाळांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालय शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील सपकाळ यांनी केले तर आभार प्रदर्शन अशोक खोरखडे यांनी केले.

# अंढेरा पोलिस स्टेशनचे नवीन ठाणेदार रूपेश शक्करगे रुजू

**जनसंचलन/ देवळगाव राजा**

तालुक्यातील आणि चिखली तालुक्यातील बरेच गावे देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये आहे अनेक बाबतीमध्ये बऱ्याच दिवसापासून अंढेरा पोलीस स्टेशन चर्चेत असल्यामुळे येथील पोलीस स्टेशन कडे जिल्ह्यातील नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून असलेल्या काही दिवसापूर्वी स्थानिक गुन्हा शाखा बुलढाणा मधील अधिकारी यांनी टाकलेल्या धाडीमध्ये अंढेरा पोलीस स्टेशन मध्ये अवैद्य खसखस लागवड चा प्रकार उघडकीस आला आणि त्यामध्ये अंढेरा पोलीस स्टेशनचे स्थानिक ठाणेदार यांना कारवाई ची भनक सुद्धा लागली नव्हती नंतर ते कारवाई मध्ये सहभागी झाली हा भाग वेगळा पण धाड टाकेपर्यंत अंढेरा पोलिस स्टेशनला कारवाई ची माहिती नव्हती स्थानिक गुन्हा शाखा बुलढाणा यांनी अंढेरा पोलीस स्टेशन यांना खबर लागू दिली नव्हती किंवा अंढेरा पोलिस यांना कारवाई पासुन सुरवातीला दुर ठेवले होते नंतर कारवाई मध्ये समिल सुद्धा झाले होते अंढेरा पोलीस स्टेशन पासून अवघ्या हाकेच्या अंतरावर असलेल्या खसखस लागवडीचा प्रकार हा स्थानिक अंढेरा पोलीस स्टेशनला माहित नव्हता की काय किंवा ते जाणून बुजून दुर्लक्ष करत होते हा सुद्धा संशोधनाचा विषय झाला होता अंढेरा पोलीस स्टेशन हद्दीमधील गावांमध्ये अवैद्य गुटखा विक्री जोमात सुरू आहे स्थानिक पोलीस स्टेशनच्या अवतीभवती सुद्धा जोमात गुटखा विक्री सुरू आहे संपूर्ण महाराष्ट्र मध्येच अवैध गुटखा विक्री बंदी असताना सुद्धा गुटखा विक्री वाल्यांची एवढी मजुरी आहे की ते स्थानिक पोलीस स्टेशनच्या अवतीभवती सुद्धा गुटखा विक्री जोमात करते हे कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे हा सुद्धा संशोधनाचा विषय आहे परंतु नवीन ठाणेदार यांनी या बाबीकडे लक्ष देऊन जी अवैध गुटखा वाहतूक व विक्री अंढेरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत जोमात सुरू आहे त्याकडे लक्ष देण्याची गरज निर्माण होणार आहे स्थानिक पोलीस स्टेशन यांना लोकांनी तोंडी तक्रारी देऊन सुद्धा स्थानिक पोलीस स्टेशन व एस डी पी ओ मनीषा कदम मॅडम यांना सुद्धा तोंडी तक्रार देऊन सुद्धा त्यांनी त्यांच्याकडे कानाडोळा केला आहे त्यामुळे अवैध गुटखा विक्रीला अंढेरा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये जोरात सुरू आहे स्थानिक आमदार मनोज कायंदे यांनी पहिल्याच बैठकीमध्ये सांगून सुद्धा अंढेरा पोलीस स्टेशनच्या परिसरातील अवैध गुटका विक्री बंद झाली नाही राजरोसपणे अवैध गुटखा विक्री सुरूच आहे एक प्रकारचे स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीमध्ये स्थानिक आमदार मनोज कायदे यांनी केलेल्या आव्हानाला केराची टोपलीच दाखवली आहे की काय हे सुद्धा हे दिसून येत आहे स्थानिक गुन्हा शाखा बुलढाणा यांच्या पथकाने धाड टाकून कारवाई केली होती त्याचाच फटका स्थानिक ठाणेदार यांना बसला असल्याची खमंग चर्चा लोकांमध्ये सुरू आहे त्यामुळे स्थानिक ठाणेदार यांची बदली झाली आहे चर्चा सुरू आहे विशेष म्हणजे नवीन ठाणेदार रुपेश शक्करगे हे अंढेरा पोलीस स्टेशन हद्दीमधील खसखस पकडण्याच्या कारवाईमध्ये स्थानिक गुन्हा शाखा बुलढाणा यांच्या टीम मध्ये हजर होते आणि त्यांचीच नियुक्ती अंढेरा पोलीस स्टेशन मध्ये ठाणेदार म्हणून झाली आहे.हि बाब विशेष आहे

# शिवसाई युनिव्हर्सल स्कुल बुलढाणा येथे राष्ट्रीय विज्ञान दिवस मोठ्या उत्साहात साजरा...

**जनसंचलन/बुलढाणा**

शिवसाईचे आजचे बाल वैज्ञानिक भविष्यात देशाचे प्रतिनिधित्व करतील. श्री दिनकर चिंचोले सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी बुलढाणा* भारत देशाचे थोर वैज्ञानिक नोबेल पारितोषिक विजेते डॉ. सी. व्ही. रामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी शोधाचे सादरीकरण केलेल्या रामन इफेक्ट चे औचित्य साधुन १९८७ पासून २८ फेब्रुवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिवस मोठ्या उत्साहात भारत देशामधे साजरा करण्यात येतो. याचेच औचित्य साधुन शिवसाई शाळेचे विद्यार्थी यांच्या कलागुणांना वाव मिळावा, वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा म्हणुन दरवर्षी आपली शाळा राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा केला जातो. आज दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी शिवसाई युनिव्हर्सल स्कुल बुलढाणा येथे राष्ट्रीय विज्ञान दिवस निमीत्त शिवसाई ज्ञानपीठ तुळशी नगर बुलढाणा व युनिव्हर्सल स्कुल कोलवड येथील दोन शाळांची आंतरशालेय विज्ञान स्पर्धा आयोजीत करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटक श्री. डी.एच.चिंचोले सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी बुलढाणा उपस्थित होते, तर अध्यक्ष स्थानी शिवसाई परिवाराचे संस्थापक श्री डी. एस.लहाने उपस्थित होते. प्रमुख पाहुणे व परीक्षक म्हणून श्रीराम पवार, डॉ.यशवंत पाटील, प्राचार्य. राजेश जाधव, डॉ.मनोज व्यवहारे, सुधाकर साखरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटक यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की डी एस लहाने यांनी शिवसाई शाळेचे छोटेसे रोपटे आज वटवृक्ष होऊ पाहतोय आणि याचीच प्रचिती म्हणून शिवसाईच्या चार शाखा मिळून दोन हजार पेक्षा जास्त विद्यार्थी दर्जेदार शिक्षण घेत आहेत. आणि निश्चितच आजच्या सहभागी बाल वैज्ञानिक उद्याचे थोर वैज्ञानिक घडतील यात शंका नाही.विज्ञान प्रदर्शन मधे सहभागी प्रथम गृप वर्ग नर्सरी, ज्युनिअर केजी, सिनियर केजी च्या विद्यार्थांनी व द्वितीय गृप वर्ग १ ते पाचवी व तृतीय गृप वर्ग ६ वी ते ९ वी च्या वर्ग स्तरावर सहभागी ७५३ विविध वैज्ञानिक उपकरणे, प्रयोग, सादर करण्यात आले होते. पैकी प्रत्येक वर्गातून ३ नंबर विजेते निवडले गेले होते त्यापैकी आज १०५ स्पर्धक सहभागी झाले होते त्यामधून तीन गृप मधून विजेत्या विद्यार्थ्यांना गोल्ड, ब्रॉंझ, व सिल्वर मेडल व सन्मानचिन्ह देऊन उपस्थित मान्यवरांचा हस्ते गौरविण्यात आले. तसेच मागिल १५ दिवसापूर्वी आयोजित केलेल्या विद्यार्थी, पालक व शिक्षकांच्या वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आजच्या दिवशी बक्षीस वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता त्यामध्ये. सांघिक खो खो, मॅटवर




कब्बडी, टग ऑफ वार, रनिग, ई. खेळ घेण्यात आले होते त्यामधून विजेत्या संघाना ट्रॉफी,मेडल व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डी एस लहाने यांनी विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे कौतुक केले व असेच प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करावे जेणेकरून विद्यार्थी अष्टपैलू भूमिका साकारतील व आपल्या शाळेचे तसेच आपल्या राज्याचे नावलौकिक वाढवतील. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन वर्ग ८ वी चे विद्यार्थी दिया बारवाल, समृद्धी पवार यांनी केले तर स्टेज ची जबाबदारी अंकिता भालेराव निकिता भालेराव, काव्या भारंबे, हर्षदा काळुसे यांनी पार पाडली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी. डी बी मोहरकर, गोपाल आडवे, सागर उबाळे, अर्चना हिवाळे व सर्व शिक्षीका व शिक्षकेतर कर्मचारी व आदरणीय पालक वर्ग यांची मोलाची साथ लाभली व दिलेली कामगिरी व्यवस्थित बजावली व राष्ट्रीय विज्ञान दिन तसेच वार्षिक क्रीडा स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडली

# श्री उत्तमदास उदासीन महाराज व श्री अंधेरा महादेव संस्थान चिखली येथे महाशिवरात्री महोत्सव संपन्न

**जनसंचलन/ चिखली**

स्थानिक जुने गाव परिसरामध्ये श्री खंडेराया माधव संस्थान चिखली येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाशिवरात्री महोत्सव २०२५ साजरा करण्यात आला यावेळी संस्थांमध्ये भरगच्च असे आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यामध्ये तीन दिवसीय परिणाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले या सप्ताहामध्ये सकाळी काकडा भजन दुपारी अध्यात्मिक प्रवचन संध्याकाळी हरिपाठ उपासना व संध्याकाळी कीर्तनाचे आयोजन करण्यात आले दिनांक २५ २ २५ पासून सुरु होणारे



या सप्ताह मध्ये दिनांक २५ रोजी रात्री ८ वाजता ह भ प रामेश्वर महाराज पळसखेड सपकाळ, दिनांक २५ २ २५ महाशिवरात्रीच्या दिवशी सकाळी रुद्राभिषेक, ११ वाजता शिवलीलामृत ११ अकराव्या अध्यायाचे सामूहिक पठण तसेच दुपारी चार वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात आली यात परिसरातील झेंड्या उत्साहाने सहभागी झाल्या होत्या रात्री आठ वाजता ह भ प जनार्दन स्वामी महाराज अंसरवाडी यांचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले तर दिनांक २७ २ २५ रोजी ह भ प श्याम महाराज डाकोरकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने व त्यानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी नीलकमल गणेश मंडळ आई तुळजाभवानी नवरात्र उत्सव मंडळ व श्री अंधेरा महादेव महिला भजनी मंडळ जुन्या गावातील व मंदिर परिसरातील तरुण-तरुणी महिला .भगिनी व पुरुष मंडळींनी अथक परिश्रम घेतले.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958